**किरकोळ फौ. अर्ज क्र. ७१/२०२४**
प्रमिला वि. कोमल
**निशाणी नं. १ खाली**

## <u>फिर्यादीची पडताळणी निशाणी क्र.१ खाली</u>

मी देवाची शपथ घेवुन खरे सांगते की, माझे नांव प्रमिला राजू जगताप असून दिनांक ०८.०१.२०२४ रोजी माझी सुनबाई नामे कोमल संकेत जगताप बाळाला घेवून आली. आम्ही सगळयांनी बाळाचे स्वागत केले, जेवणासाठी पावभाजी व गुलाबजामून, पेढे व मुलाचा वाढदिवस होता म्हणून केक आणला होता. त्यांची लोक जेवण करुन गेले. आम्ही तिघी म्हणजे मोठी सुनबाई, मी व कोमल यांचे जेवण करायचे राहिलो होतो. मोठी सुनबाई पाव भाजत होती व कोमल ताट करत होती. त्यावेळी कोमलने खिशातून एक पावडरची पुडी काढली आणि ती टाकतांना मोठया सुनबाईने बघितली व तिने विचारले की, हे काय करतेस, काय टाकल आईच्या ताटात. कोमलने सांगितले की, बाळाची डस्ट पावडर आहे ती चुकून पडली. ही गोष्ट मला माहित नव्हती कारण मी बाळाला घेवून बसले होते. तिने ताट धुवून घेतले. परत तिने ताट माझ्या समोर ठेवले पण त्याच्यात काळे कण दिसले, मोठया सुनबाईने ते चाटून बघितले असता त्याची चव खुप प्रंचड कडू होती. तिने ते ताट तिच्यापुढे दिले आणि तिचे ताट मला दिले. तिच्या लक्षात आल्यावर कोमलने तिचे ताट बदलून घेतले.

२. दुस–या दिवशी मोठी सुनबाई मुंबईला गेली. तिला सोडण्यासाठी माझे पती पुण्यात गेले होते. मी सकाळी मुलाचा डब्बा तयार करुन आम्ही बस स्टॉप पर्यत चालत गेलो. ०७.४५ वाजता गेलो. ०८.३० पर्यत मी बाहेर होते. मी घरी आले. मोबाईल चालत नव्हता. ०९.०० वाजता मुलाचा व्हॅाट्सअपवर कॉल आला. मी त्याला सांगितले की, माझा मोबाईल बंद झाला आहे. माझे पती घरी आले नव्हते म्हणून त्याला फोन केला तेव्हा कळले मोबाईल लागत नाही. नंतर माझे पती डोसे व चटणी घेवून आले. त्यावेळी कोमल म्हणाली बाळाला घ्या मी वाढून घेते. तिघांना तीन वाटयात चटणी वाढून घेतली. त्या दोघांनी माझ्या अगोदर खाल्ली होती कारण मी बाळाला घेवून बसले होते. मी चटणी खायला बसली त्याची चव मला प्रचंड कडू लागली. त्यावेळी माझे पती पण म्हणाले आम्ही चटणी खाल्ली सर्वांनी पंरतु आम्हांला कडू वाटली नाही. ती मला म्हणाली की, थोडीसी कडू आहे खावा. तरीही पण माझ्या लक्षात आले नाही मी चटणी टाकून दिली कच–याच्या डब्यात व खाल्ली नाही.

३. मोबाईल चालत नाही म्हणून मी शेजारच्या बाईला विचारायला गेले. तर ती

**किरकोळ फौ. अर्ज क्र. ७१/२०२४**
प्रमिला वि. कोमल
**निशाणी नं. १ खाली**

बोलली की त्या मोबाईलमध्ये सिमकार्ड नाही, दोन्ही सिमकार्ड काढले आहेत. आम्ही गावात जिओच्या गॅलेरीत गेलो. तेथे मशिन बंद होती त्यांनी सांगितले दुपारी या. आम्ही तेथेच थांबलो. त्यांनी सांगितले की, दोन्ही कार्ड काढलेले आहेत. आम्ही त्यांना सांगितले आम्ही ते कार्ड काढले नाहीत. आम्ही घरी येवून सिमकार्डचा शोध घेतला. त्यानंतर ०६.०० वाजता मला माझ्या मोठया मुलाचा फोन आला. तेव्हा सुनबाईने सांगितले की, आई तुमच्या बाबतील असा-असा प्रकार घडला. तेव्हा मी तिला म्हणाले मी सकाळी डोशाची चटणी खाताना या चटणीची चव पण प्रचंड कडू होती. तिने सांगितले की, काळजी घ्या खाउ नका.

४. मुलगा घरी आल्यावर सिमकार्ड शोधण्यासाठी डस्टबीन शोधला त्यामध्ये आम्हांला रुमालात बांधलेली रॅट किलची पावडर सापडली ती नवीन रुमालात बांधली होती. मुलाने विचारले मम्मी ते काय आहे. तर त्यावेळी मी मुलांला वरील प्रमाणे सांगितले. मुलाने तिला विचारले की असे का केले. तर ती म्हणाली घरात सापडली. आमच्याकडे उंदीर नाही. हे तिच्या नातेवाईकांना कळवले. ते रात्री ०३.३० वाजता ६ ते ७ जण आले. सर्व सामान भरुन घेवून गेले. माझे मंगळसूत्र साडेतीन तोळयाचे, नवीन कपडे घेवून गेले. बाळाला घेवून गेले. ते आल्यावर आम्हांला भांडण होते की, तुम्ही आजून मेल्या नाही न. आम्ही जातांना तिला विचारतो असे बोलले. कोमलला त्यांनी घेवून गेलो. दुस-या दिवशी आम्ही पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दिली. पोलिसांनी पंचनामा केला. पोलिसांनी त्यांना एकदा बोलवून घेतले. पोलिसांनी कारवाई केली नाही उलट आम्हांला सांगत होते की, तक्रार मागे घ्या. आमची विनंती आहे की, आम्हांला न्याय मिळावा.

PRJagtap
**फिर्यादीची सही**

ADV. S. B. Raut.

**समक्ष**

MOHDTAHER BILAL MOHD ISHAQUE

Digitally signed by MOHDTAHER BILAL MOHD ISHAQUE
Date: 2025.01.15 18:05:19 +0530

**(म.ताहेर बिलाल)**

दिनांक : १५/०१/२०२५

प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी सासवड